Publication: Punyanagari
Date: 27/6/2019
Page: 4
Column: 1

पुण्य नगरी

गुरुवार, २७ जून २०१९

# सुलभ बिल भरण्यासाठी अदानी समूहाचे 'जिनिअस पे'

**मुंबई :** अदानी इलेक्ट्रीसिटीने मुंबईच्या सुलभ बिल भरण्यासाठी स्वयंदेयक किओस्क जिनिअस पे सादर केले आहे. जिनिअस पेच्या सादरीकरणासह एईएमएलने बिल भरण्याची प्रक्रिया सुलभ केली आहे. ग्राहकांना आता अधिक काळ रांगांमध्ये उभे राहावे लागणार नाही. मुंबईतील ग्राहकांच्या सोयीनुसार, जिनिअस पे किओस्क स्थापित करण्यात येतील आणि धनादेश, रोख, डेबिट/क्रेडिट कार्डच्या माध्यमातून देयके स्वीकारण्यात येणार आहेत. एईएमएल मुंबईभरात जिनिअस पे किओस्क स्थापित करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे ग्राहकांपासून ५ मिनिटांच्या अंतरावर त्वरित देयके भरण्यासाठी या इंटरॲक्टिव्ह डिजिटल किओस्क यंत्रणेचा वापर करू शकतात. ग्राहकांसाठी जिनिअस पे सेवा रोज सकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत उपलब्ध असणार आहेत. ग्राहक किओस्क मशिन्सच्या माध्यमातून बिलांच्या नकल प्रती उपलब्ध होणार आहेत. मुंबईतील एक आघाडीची वीज वितरण कंपनी म्हणून ग्राहकांना उत्तम सेवा प्रदान करण्यासाठी अदानी प्रयत्नशील असून, या नव्या तंत्रज्ञानामुळे चॅटबोट, वॉईसबोट, बिझनेससाठी व्हॉट्सअप आणि ऑटोमेटेड आयव्हीआर अशा उपयोगी सेवा सादर होणार असल्याचे प्रवक्त्यांकडून सांगण्यात आले आहे.